# प्रकरण पहिले

## प्रकरण पहिले

# श्याम कुरळे यांचा परिचय

### प्रस्तावना

मराठी वाङ्‌मयाच्या प्रांतात विविधांगी लेखन करणाऱ्या श्याम कुरळे यांनी कथा, कादंबरी, कविता, नाटक, एकांकिका व विविध प्रकारचे बालसाहित्य विपुल प्रमाणात निर्माण केले आहे. त्यांच्या कथा वाङ्‌मयाचा अभ्यास करण्याचे प्रस्तुत लघुप्रबंधात योजिले आहे. श्याम कुरळे यांचा परिचय प्रस्तुत प्रकरणात करून घ्यावयाचा असून त्यांचे बालपण, शिक्षण, लेखन, प्रेरणा व त्यांचे समकालीन मराठी कथाकार व त्यांच्या पाऊलवाटेवरून जाताना त्यांनी कथा वाङ्‌मयात घातलेली भर यांचा विचार या प्रकरणात करावयाचा आहे.

कथा, कविता, कादंबरी, नाटक, एकांकिका, ललितलेख व विपुल प्रमाणात बालवाङ्‌मय निर्माण करणारे शामराव बजरंग कुरळे यांचा जन्म १६ सप्टेंबर १९४३ रोजी सह्याद्रीच्या कडेकपारीत, गैबी घाटाच्या पूर्व बाजूस वसलेल्या सोळांकूर या गावी झाला. वडीलांचे नांव बजरंग (बजाप्पा) बाळा कुरळे. आईचे नांव हिराबाई. या दापत्यांना चार अपत्ये. त्यात श्याम कुरळे थोरले अपत्य होय. अतिशय गरीब शेतकरी कुटुंबात श्याम कुरळे यांचा जन्म झाला. बालपणापासूनच त्यांना जीवनसंघर्ष करावा लागला. प्राथमिक शिक्षण जन्मगावी झाले तर माध्यमिक शिक्षणासाठी गारगोटी येथील मौनी विद्यापीठात धाव घ्यावी लागली. सोळांकूर या जन्मगावी ७ वी पर्यंत शिक्षण प्रथम क्रमांकाने पास होऊनही घरच्या आत्यंतिक गरीब परिस्थितीमुळे पुढील शिक्षण परगावी जाऊन घेणे म्हणजे कुरळे यांना एक दिव्यच होते. प्राथमिक शिक्षण पूर्ण होऊनही परिस्थितीमुळे त्यांच्या वडिलांनी त्यांना गावातील एका दुकानात हिशोबनीस म्हणून कामावर ठेवले. हिशोबाबरोबर किरकोळ कामेही कुरळे यांना करावी लागत.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

श्याम कुरळे यांची शिक्षणाबद्दलची तळमळ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती, ते वारंवार आपल्या वडिलांना त्यांची इच्छा बोलून दाखवत. प्रसंगी ते एक एक दिवस जेवतही नसत. एक वर्षानंतर त्यांच्या वडिलांनी कुरळे यांना गारगोटीला पाठविण्याचा निर्णय घेतला. सोळांकूर ते गारगोटी असा पायी प्रवास करून ते गारगोटीला पोहोचले. डी. एड. साठी मौनी विद्यापीठात पोहोचल्यावर त्यांना कळले की वय १८ पूर्ण असल्याशिवाय डी. एड. साठी व प्राथमिक शिक्षकांच्या नोकरीसाठी वय नसल्यामुळे त्यांना अर्ज करता आला नाही.

मौनी विद्यापीठात त्यावेळी डॉ. द. गो. दसनूरकर हे डी. एड. चे प्राचार्य होते व त्यांच्या पत्नी स्नेहलता दसनूरकर त्याच कॉलेजवर प्राध्यापिका होत्या. या उभयतांची भेट झाली. दसनूरकर दापत्यांनी कुरळे यांची विचारपूस करून त्यांना वसतिगृहात ठेवण्याचा निर्णय घेतला. कुरळे यांची हुशारी व चुणचुणीतपणा व शिक्षणाबद्दलची तळमळ दसनूरकर दापत्यांच्या नजरेतून सुटली नाही. श्याम कुरळे व त्यांचे वडील वसतिगृहाचे सुपरिंटेंडेंट काशीनाथ भोसलेना भेटले. वसतिगृहात प्रवेश घ्यावयाचा असेल तर सरवडे भागातून एकाच विद्यार्थ्याची निवड करावयाची आहे, त्यासाठी सरवडे येथील दोन प्रतिष्ठीत नेत्यांची ओळखपत्रे आणावी लागतील. त्यासाठी एकच दिवसाची मुदत असल्याचे सांगितल्यावर, कुरळे व त्यांचे वडील तडक सरवडेला पायी प्रवास करून पोहोचले. संबंधित प्रतिष्ठीत व्यक्तींची पत्रे घेऊन ते सोळांकूरला पोहोचले. त्या रात्री त्यांच्या घरी कोणीही झोपले नाहीत, भल्या पहाटे अंधारातूनच मधल्या वाटेने पायी प्रवास करत सकाळी सहाला त्यांनी सुपरिंटेंडेंट यांचे घर गाठले व वसतिगृहात प्रवेश मिळविला.

प्रवेशतर मिळाला, पण इतर किरकोळ खर्चाचे काय करायचे असा प्रश्न कुरळे यांच्यासमोर उभा राहिला. दसनूरकर दापत्यांनी कुरळे यांना दिलासा दिला व किरकोळ खर्चाची त्यांनी जबाबदारी उचलण्याचे ठरविले. रिकाम्यावेळी कुरळे दसनूरकरांच्या घरी किरकोळ कामे करत. यातून त्यांचा स्वाभिमान दिसून येतो. प्रामाणिकपणा

व कष्टाळूपणामुळे दसनूरकर दापत्यांना त्यांचा लळा लागला. ते कुरळे यांना स्वत:च्या मुलाप्रमाणे वागवू लागले. डॉ. द. गो. दसनूरकर हिंदीचे गाढे अभ्यासक व कवी होते तर त्यांच्या पत्नी स्नेहलता दसनूरकर या कथाकार होत्या. या दोन्ही दापत्यांच्या सानिध्यातून, संस्कारातून कुरळे यांचे जीवन संस्कारमय होत होते. या दोघांच्या संस्कारातून कुरळे यांना हिंदीचे ज्ञान चांगल्या प्रकारे अवगत झाले. कवी दसनूरकर व कथाकार स्नेहलता दसनूरकर यांच्या प्रभावातून त्यांना लेखनाची प्रेरणा मिळाली. शालेय जीवनात असतानाच लेखन कला अवगत करण्याची प्रेरणा दसनूरकर दापत्यांच्या संस्कारातून घेतली.

गारगोटी येथे मे महिन्याच्या सुट्टीमध्ये मिलिट्री शिक्षण देण्यासाठी जोधपूरवरून शिक्षक कमांडर कर्नल दीपसिंह आले होते. लेफ्टनंट कर्नल दीपसिंहाना मराठी भाषा येत नव्हती. त्यांची भाषेतील अडचण दूर करण्यासाठी दसनूरकरांनी कुरळे यांची निवड केली. कुरळेना हिंदी भाषा अवगत असल्यामुळे दीपसिंहांना ते हिंदी अनुवाद करून सांगत. कुरळे यांची काम करण्याची सचोटी आणि कर्तव्यनिष्ठा पाहून दीपसिंहांनाही कुरळे यांचा लळा लागला. दीपसिंह हे रसिकमनाचे होते. कुरळे हे मराठी कविता करून त्याचा हिंदी अनुवाद करून दीपसिंहाना वाचून दाखवत. दीपसिंह भारावून जात. दीपसिंह जोधपूरला जाताना कुरळे यांना घेऊन जाण्याचा मानस दीपसिंहानी कुरळे यांच्या वडीलांना बोलून दाखविला. त्यावर त्यांच्या वडीलांनी नम्र नकार दिला.

दीपसिंहाबरोबर कुरळे जर जोधपूरला गेले असते तर, त्यांच्या जीवनाला एक वेगळीच कलाटणी मिळाली असती. कदाचित एका मोठ्या साहित्यिकाकडून साहित्य निर्माण होण्याची शक्यता मावळली असती. शालेय शिक्षण चालू असतानाच कुरळे यांनी दसनूरकर दांपत्यांच्या सांगण्यावरून आई-वडीलांनाही गारगोटी येथे आणले होते. तेथे मेसची कामे देऊन दसनूरकरांनी त्यांना रोजगार मिळवून दिला होता. त्यामुळे दसनूरकर दांपत्य व कुरळे यांचे कुटुंबिय यांचे जिव्हाळ्याचे ऋणानुबंध निर्माण झाल. कथाकार

स्नेहलता दसनूरकर कुरळे यांच्या लेखनकलेबद्दल नेहमी म्हणायच्या ‘माझा वारसा शाम चालवेल.’ तसे त्यांनी दाखवून दिले आहे.

एस. एस. सी. पास झाल्यावर दसनूरकरांना कुरळे यांनी इंजिनिअर व्हावे असे वाटत होते. पण कुरळेंचा अध्यापन आणि लेखन यांच्याकडे ओढा होता. त्यामुळे त्यांनी चांगले मार्क मिळवूनही इंजिनिअरिंगला न जाता डी. आर. एस. समकक्ष बी. एड. हा चार वर्षाचा कोर्स पूर्ण केला व प्रथमश्रेणीत पास झाले. त्यांनी सहा ठिकाणी नोकरी साठी अर्ज केले. सहाही ठिकाणांवरून त्यांना नेमणुकीच्या ऑर्डरी मिळाल्या. खडतर प्रवासाची, अथक परिश्रमाची पोच पावती या ऑर्डरीतून त्यांना मिळाली होती.

१९६६ ला मुरगूड विद्यालयात हिंदी, मराठी या विषयाचे शिक्षक म्हणून अध्यापनास सुरूवात केली. तेथे दोन वर्षे काम करून १९६८ ला भोगावती हायस्कूलमध्ये अध्यापक म्हणून रूजू झाले. १७ मे १९६७ ला त्यांचा विवाह कागल येथील ईश्वर दाजी चव्हाण यांची सालस, सुशील कन्या कमल यांच्याशी झाला. लग्न झाले तेव्हा त्यांच्या पत्नी कमल मॅट्रीकही नव्हत्या. कुरळे यांनी प्रोत्साहन देऊन पुढील शिक्षण पूर्ण करून बी. एड. करून घेतले. घरी कुरळे थोरले असल्यामुळे लहान भावडांचीही जबाबदारी या दोघा पती-पत्नीवर होती. आई-वडीलांनी अपार कष्ट सोसून कुरळेना एक प्रतिष्ठीत व्यक्ती बनविले होते याची जाणीव या उभयतांना होती. त्यांनी आई-वडीलांच्या आज्ञेबाहेर न जाता संसाराल सुरूवात केली. कमल कुरळे जून १९८४ ला राशिवडे बु।। येथील नागेश्वर हायस्कूलमध्ये अध्यापिका म्हणून रूजू झाल्या. पुढे कुरळे यांनी मराठी व हिंदी दोन्ही स्वतंत्र विषय घेऊन एम. ए. केले.

शालेय जीवनापासूनच लेखन व वाचनाची आवड होती. या आवडीतून ते गारगोटी येथील परूळेकर वाचनालयात नेहमी जात. तेथील साप्ताहिके, मासिके, अंक वेगवेगळी नियतकालिकांचे वाचन, मनन, चिंतनातून त्यांचा व्यक्तीविकास होत गेला.

त्यांच्या जीवनावर साने गुरूजींच्या वाङ्मयाचा प्रभाव जास्त आहे. त्यांच्या समग्र वाङ्मयातून व बालवाङ्मयातून याची प्रचिती येते.

१९६८ पासून भोगावती हायस्कूलवर अध्यापन करताना हिंदी, मराठीचे त्यांचे अध्यापन अत्यंत प्रभावी व विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सदैव स्मरणीय ठरले आहे. तब्बल ३५ वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीत अध्यापक, पर्यवेक्षक ते मुख्याध्यापक असा प्रवास करताना शालेय जीवनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणला.

आज त्यांचे अनेक शिष्यगण मोठमोठ्या पदावर विराजमान झाले आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांनी मिळविलेला नावलौकिक याचे सर्व श्रेय कुरळे यांना जाते. लोककल्याणासाठी शैक्षणिक उपक्रमाद्वारे वेगवेगळ्या अभियानांतर्गत आकाशवाणी, दूरदर्शनवरून शेकडो कार्यक्रम त्यांनी सादर केले. त्यांनी लिहिलेल्या एकांकिका, नाटिका संपूर्ण महाराष्ट्रातील विविध शिक्षणसंस्थांच्या स्नेहसंमेलनातून, विविध कार्यक्रमातून सादर झाल्या. लेखन त्यांचा जन्मजात पिंडच. वाचन, मनन, लेखनाविषयीची ओढ व त्यांची प्रतिभा ही अष्टपैलू आहे. बालसाहित्यापासून प्रौढसाक्षर निरीक्षरासाठी सातत्याने लेखन प्रपंच करणारे ते सिद्धहस्त लेखक आहेत. समृद्ध भाषाशैली, प्रभावी अध्यापन, निगर्वी स्वभाव यामुळेच लोकप्रिय शिक्षक म्हणून त्यांनी नावलौकिक मिळविला आहे.

शालेय उपकम राबवताना, कष्ट घेत असतानाही ते सदैव उत्साही, हसतमुख व प्रसन्न असत. ''साहित्यक्षेत्रातील प्रसन्न व्यक्तिमत्त्व''[१] म्हणूनही त्यांना ओखळले जाते. श्याम कुरळे यांनी अनेक शैक्षणिक उपक्रमाद्वारे लोकजागृतीबरोबर अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, प्रौढसाक्षर निरीक्षरांसाठी राबवलेले अनेक उपक्रम यातून सर्वांगीण विकास साधला आहे. या त्यांच्या कार्याचा गौरव करण्याकरिता भारत सरकारच्या मानव संसाधन व विकास मंत्रालयाच्या शिक्षण विभागाने त्यांना 'राष्ट्रपती' पुरस्काराने ५ सप्टेंबर १९९९ ला गौरविले आहे. या अगोदर त्यांच्या अनेक साहित्यकृतीना अनेक पुरस्कार व मानसन्मान मिळाले आहेत. त्यात 'त्रिताल' या एकांकिकेस १९८२ सालाचा राज्य पुरस्काराने सन्मानित

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

केले व त्यांच्या 'डिंग डिंग डिंगी' या बालगीत संग्रहास दुसऱ्यांदा २००४ ला पुरस्कृत केले आहे.

आपल्या लेखनात त्यांनी खेड्यातील अज्ञानी, निरक्षर, उपेक्षित समाजाला केंद्रस्थानी मानून लेखन केले आहे. त्यांच्या समग्र वाङ्मयातून याचा प्रत्यय येतो. बालपणापासून केलेल्या खडतर प्रवासातून अनेक संकटातून त्यांनी जे पाहिले व अनुभवले त्याचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात दिसून येते. ज्या ज्या व्यक्ती त्यांच्या सहवासात आल्या व स्वत: केलेल्या निरीक्षणातून त्यांचे लेखन एक वेगळा पैलू उलगडून दाखविते. कुरळे यांचे आजही सातत्याने लेखन चालू असते. दैनिके, साप्ताहिके, मासिके, विविध दिवाळी अंकातून त्यांचे लेखन प्रसिद्ध होत आहे. आजही ते विविध साहित्य चळवळीत भाग घेतात. विविध संस्थांना, उदयोन्मुख लेखक, कवींना मार्गदर्शन करताना दिसतात. अप्पासाहेब खोत, रजनी हिरळीकर या अशा अनेक साहित्यिकांनीही कुरळे यांचे मार्गदर्शन घेतले आहे. भोगावती हायस्कूल (शाहूनगर परिते) मध्ये अध्यापक, पर्यवेक्षक ते मुख्याध्यापक असा ३५ वर्षाचा प्रदीर्घ सेवेचा प्रदीर्घ कालखंड पार पाडून ते ३१ सप्टेंबर २००१ ला रीतसर निवृत्त झाले.

कौटुंबिक जीवनात त्यांचे सौख्य बहरण्यासाठी संदिप व प्रशांत व मुलगी सौ. प्रज्ञा सरांच्या संस्कारातून कर्तृत्ववान बनली आहेत. सौ. कमल कुरळे त्यांच्या पत्नीनी कुरळे यांना जन्मभर साथ देत संसारवृक्ष फुलविला. त्यात कमलबाईंचा वाटा मोठा आहे. निवृत्तीचे जीवन जगत असताना साहित्याच्याबाबत जे आराखडे व मनन, चिंतन आहे त्याचा निवृत्तीच्या काळात सदुपयोग करून घेण्यासाठी कुरळे यांची कसदार लेखणी सज्ज झाली आहे.

त्यांचे आजवरचे प्रकाशित वाङ्मयाची ग्रंथसंपदा १०० च्यावर जाईल इतका त्यांच्या लेखनाचा वेग आहे.

एकाचवेळी इतके साहित्य प्रकार हाताळण्याची सचोटी, कसब व अष्टपैलू प्रतिभा एखाद्याच लेखकाला लाभते. म्हणूनच "बहुआयामी व्यक्तिमत्त्व"[२] असे बा. स. पाटील म्हणतात. विपुल प्रमाणात साहित्य निर्माण करण्याची खरी प्रेरणा पूज्य साने गुरूजींच्या वाङ्मय वाचनाने कुरळे यांना मिळाली. कै. रा. वा. शेवडेंचे ते शिष्य झाले. "बालवाङ्मयाद्वारे उत्कर्ष साधणारा कवी"[३] असे संबोधन प्रा. मधुकर वेदांते करतात. श्याम कुरळे यांची 'सद्गुरू' ही पहिली कथा 'स्वराज्य' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली. त्यांची पहिली कथा बोधपर असून नाविन्याच्या खुणा त्यात जाणवत नाहीत. त्यानंतर अनेक मासिकातून, साप्ताहिकातून, नियतकालिकांतून, दिवाळी अंकातून त्यांनी कथा लिहिण्यास सुरूवात केली.

कथावाङ्मयात भर घालत असतानाच त्यांनी कादंबरी लेखन केले. त्यात 'पुनर्मीलन' (१९८२) , चक्रव्यूह ( २००६) या दोन कादंबऱ्या आहेत. दोन्ही कादंबऱ्या प्रकृतीने भिन्न असूनही व्यक्तिरेखा, विषय, सामाजिक, राजकीय, परिणामाची तीव्रता दोन्ही कादंबरीतून दिसून येते. अध्यापन आणि लेखन यातील समतोल व सातत्य राखत विपुल प्रमाणात वाङ्मयाची निर्मिती करत त्यांनी काव्य, बालगीत संग्रह, कादंबरी, कथा, ललितलेख, नाटक, नाटिका इतके साहित्यप्रकार हाताळत असताना प्रौढसाक्षरांसाठी नाटिका, बालवाङ्मयात भर घालत बालकादंबरी, बालकथा संग्रहांची भर घातली आहे. त्यांच्या दोन पुस्तकांची इंग्रजी भाषांतरे झाली आहेत. त्यांच्या सर्व योगदानाचा, कार्याचा गौरव नागरी सत्कार करण्यासाठी ज्येष्ठ साहित्यिक श्री. श्याम कुरळे गौरव समिती, कोल्हापूर यांनी 'अक्षरयात्री' हा गौरव अंक प्रसिद्ध केला. त्याचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे होते. या गौरव अंकाला अनेक ज्येष्ठ साहित्यिकांनी, लेखकांनी कविंनी अनेक मान्यवरांनी, स्नेही, मित्रमंडळींनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. त्यात ज्येष्ठ साहित्यिक, ग्रामीण कथाकार आनंद यादव, रा. रं. बोराडे, चंद्रकुमार नलगे,

रजनी हिरळीकर इत्यादी साहित्यिकांनी कुरळे यांच्या एकूण वाटचालीचा, कार्याचा गौरव केला आहे.

बालसाहित्याची जी कामगिरी त्यांनी विपुल प्रमाणात केली आहे त्याचा परिपाक म्हणून डिसेंबर २००२ मध्ये कऱ्हाड येथे झालेल्या साहित्य संमेलनाअंतर्गत बालसाहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली होती. त्याचवर्षी २००२ मध्ये राधानगरी येथे तिसऱ्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे सन्माननीय अध्यक्ष होण्याचा बहुमानही त्यांना मिळाला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणतात, ''साहित्याबाबत आजवर अनेक मान्यवरांनी वेळोवेळी आपले विचार मांडलेले आहेत. त्यापैकी 'जे जीवनासहित जाणारे आणि जीवनाचे हित जपणारे साहित्य हे सत्य, शिव आणि सुंदर असावयास हवे हे ओघानेच आले. ग्रामीण, नागर, दलित, आदिवासी किंवा आणखी कोणत्याही प्रकारचे साहित्य असले तरी त्याची जीवनाशी असलेली बांधिलकी सुटता कामा नये. ते जीवनाचे हित जपणारे आणि जीवन आनंदमय करणारे असावयास हवे.''[४]

भाषणात पुढे त्यांनी मराठी वाङ्‌मयाच्या जडणघडणीसोबत उदयोन्मुख लेखकांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांच्या एकसष्टी गौरवांकात ज्येष्ठ साहित्यिक आनंद यादव म्हणतात, ''श्री श्याम कुरळे हे ग्रामीण विभागात राहूनही एक निष्ठेने साहित्याची सेवा करणारे हाडाचे साहित्यिक आहेत. आजवर त्यांची साहित्याची विविध प्रकारातील अनेक पुस्तके प्रसिद्ध झालेली असून ती मान्यताप्राप्त आहेत. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. सातत्याने साहित्य निर्मिती करणे आणि तिचा दर्जा कायम टिकविणे ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही. ग्रामीण विभागात राहूनही शहराच्या तुलनेने वाङ्‌मयाला व निर्मितीला फारसे अनुकूल वातावरण नसते. तरीही श्री. कुरळे यांनी एखाद्या व्रतधारकाप्रमाणे साहित्याची सेवा केली आहे. अतिशय चारित्र्यसंपन्न, साधी राहणी आणि उच्च विचारसरणी

या गांधीजींच्या तत्वानुसार ते राहिले.''[५] हे यादव यांचे विधान कुरळे यांच्या एकूण जीवनशैलीला अचूक वाटते.

ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे यांनीही त्यांच्या साहित्याचा, कार्याचा गौरव केला आहे.

'एका शुचितेचा गौरव' अशा समर्पक नावाने लिहिलेल्या पत्रात चंद्रकुमार नलगे म्हणतात, ''विनम्र, शिष्टाचारदक्ष, व्यासंगी साहित्यिक म्हणून कुरळे यांनी साहित्यक्षेत्रात त्यांनी आपली मुद्रा उमटवली आहे. साहित्याच्या विविध वाङ्मय प्रकार त्यांच्या लेखणीने उत्तम हाताळले आहेत. साहित्य चळवळीतील वाटचालीचे ते पाईक आहेत. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेची चळवळ असो ते निरपेक्ष वृत्तीने कार्यमग्न असतात. अनेक संस्थांच्या उभारणीतील प्रेरणास्थान त्यांच्याकडे जाते.''[६] नलगे यांनी या विधानाद्वारे कुरळे यांना त्यांच्या साहित्यिक कार्याला व वाटचालीला दिलेली ही पोच पावतीच म्हणावी लागेल.

महाराष्ट्र बालकुमार साहित्यसभेच्या कार्यवाह रजनी हिरळीकर म्हणतात, ''श्री कुरळे यांचे बालसाहित्य विश्व समृद्ध आहे. याचे कारण ते उत्तम शिक्षक आहेत. चांगला शिक्षक तो की, जो मुलांचे भावविश्व जाणतो, मुलांची मने जाणून घेण्यासाठी पूज्य साने गुरूजींसारखे मातृह्दय असावे लागते ते कुरळे यांच्याकडे आहे.''[७] हिरळीकरांनी या विधानातून श्याम कुरळे यांच्या बालसाहित्यातील त्यांच्या बालमनाचा समर्पक वेध घेतला आहे.

राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाल्यावर दैनिक सकाळ मधून प्रसिद्ध झालेल्या लेखात सुहास जाधव म्हणतात, ''श्री कुरळे यांना मिळालेला हा पुरस्कार म्हणजे एका निष्कलंक व चारित्र्यसंपन्न व्यक्तीच्या कर्तृत्वाचा गौरव होय.''असे गौरवोद्‌गार त्यांनी काढले आहेत.

अनेक ज्येष्ठ साहित्यिकांच्या सहवासाने त्यांच्या लेखनात प्रभावीपणा जाणवतो. दसनूरकर साहित्यिक दांपत्याच्या सानिध्यातून, संस्कारातून घडत गेलेल्या कुरळे यांच्या कथा अनेक अंकातून, मासिकातून, नियतकालिकातून प्रसिद्ध होत होत्या.

१९८२ साली कुरळे यांनी 'फिरकी' हा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध केला. त्यानंतर 'इस्कूट', 'पायाचा पाषाण', 'इरसाल', 'पार्टी', 'अपूर्ण कथेचा शेवट', 'लास्ट अयटेम' हे सात कथासंग्रह प्रसिद्ध झाले असून कथेचा विकास बोधपरकथातून सामाजिक संदर्भाकडे वळलेला दिसून येतो. ह्या सातही कथासंग्रहातून कथालेखनाचा अभ्यास करून श्याम कुरळे यांच्या कथांची वैशिष्ट्ये, वेगळेपण, त्यांच्या कथांचे वाङ्मयीन परीक्षण करावयाचे आहे. 'फिरकी'(१९८२) पासून 'पार्टी' (२००७) पर्यंतच्या कथासंग्रहातील वैविध्य शोधण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. या एकूण कथासंग्रहातून ग्रामीण व नागरी जीवन यांचा अभ्यास करावयाचा आहे.

शालेय जीवनातून दसनूरकर दांपत्याच्या सहवासात घडलेला हा माणूस दसनूरकरांचा साहित्यिक वारसा चालविण्यास समर्थ बनला. विविध प्रकारच्या वाङ्मयाबरोबर नाट्य चित्रपटाची आवड त्यांना होतीच. चित्रपटसृष्टीतील त्या काळातील कलाकार ते दिग्दर्शन क्षेत्रातील मंडळीशी त्यांचे संबंध मित्रत्वाचे होते. ''त्यांनी बोला दाजिबा' या चित्रपटासाठी द्वंद्वगीत लेखन केले आहे. आकाशवाणीसाठी श्रुतिका लेखन केले आहे.''[९] यावरून श्याम कुरळे यांच्या एका वेगळ्याच पैलूवर प्रकाशझोत पडतो.

कथा वाङ्मयातील त्यांच्या कथा वेगवेगळ्या सामाजिक विषयांना स्पर्श करून वाचकांना बोध देतात.

## श्याम कुरळे यांचा साहित्य परिचय

श्याम कुरळे यांनी शालेय जीवनापासून लेखन आणि वाचन जोपासले. शालेय जीवनात असतानाच वाचनाची प्रचंड आवड होती. गारगोटी येथील परूळेकर वाचनालयात ते आपला बराच वेळ घालवत. त्यावेळी प्रसिद्ध होणारी दैनिके, साप्ताहिके, मासिके ते वाचत. साने गुरूजींसारख्या सहृदयी लेखकांच्या साहित्याची त्यांना प्रचंड ओढ होती. शालेय जीवनात असताना छोट्या मोठ्या कविता करण्याचा व म्हणून दाखविण्याचा त्यांचा छंद होता.

श्याम कुरळे यांची पहिली कथा 'सदगुरू' ही 'स्वराज्य' मासिकात प्रसिद्ध झाली. पुढे ते शिक्षक झाल्यावर त्यांचे लेखन चालू होतेच. त्यावेळच्या दैनिकातून, मासिकातून त्यांच्या कथा व कविता प्रसिद्ध होत होत्या. दिवाळी अंकातून काही कथा सातत्याने लिहिण्याने त्यांचे कथावाङ्मय बहरत चालले होते. शालेय जीवनापासून जरी लेखनास सुरूवात केलेली असली तरी १९८० साली त्यांनी प्रसिद्ध केलेल्या अनेक दैनिकातून, साप्ताहिकातून, मासिकातून, दिवाळी अंकातून पूर्वप्रसिद्धकथांचा 'फिरकी' नावाचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर त्यांचे एकूण सात कथासंग्रह प्रसिद्ध झाले. कथा वाङ्मयात भर टाकत, बालकांसाठीही त्यांनी विपुल लेखन केले आहे.

श्याम कुरळे यांनी 'प्रवासवर्णने' सोडून सर्व प्रकारचे साहित्यप्रकार हाताळले असल्याचे दिसते. बालवाङ्मयात मोलाची भर टाकत काव्य, बालगीतसंग्रह, बालकादंबरी, बालकथासंग्रह, कादंबरी, कथा, प्रौढसाक्षरांसाठी लेखन, नाटक, एकांकिका इतके साहित्य प्रकार हाताळले आहेत. अनेक दैनिकातून, मासिकातून प्रसिद्ध झालेल्या अनेक कथा, कविता, बालवाङ्मयास अनेक मानसन्मान मिळाले आहेत.

## संदर्भ टीपा


| | | |
|---|---|---|
| १. हिरळीकर, रजनी | : | अक्षरयात्री, ज्येष्ठ साहित्यिक श्याम कुरळे यांच्या एकसष्टीनिमित्त काढलेला गौरव अंक, २००४, संपादक दिनकर पाटील, पृ. १० |
| २. पाटील, बा. स. | : | अक्षरयात्री, तत्रैव, पृष्ठ २८ |
| ३. वेदांते, मधुकर | : | दैनिक सकाळ मधून प्रसिद्ध झालेला लेख, ५ सप्टेंबर १९९२ |
| ४. कुरळे, श्याम | : | तिसरे ग्रामीण साहित्य संमेलन, २००२ च्या अध्यक्षीय भाषणातून उद्धृत |
| ५. यादव, आनंद | : | अक्षरयात्री, ज्येष्ठ साहित्यिक श्याम कुरळे यांच्या एकसष्टीनिमित्त काढलेला गौरव अंक, २००४, संपादक दिनकर पाटील |
| ६. नलगे, चंद्रकुमार | : | अक्षरयात्री, ज्येष्ठ साहित्यिक श्याम कुरळे यांच्या एकसष्टीनिमित्त काढलेला गौरव अंक, २००४, संपादक दिनकर पाटील |
| ७. हिरळीकर, रजनी | : | अक्षरयात्री, ज्येष्ठ साहित्यिक श्याम कुरळे यांच्या एकसष्टीनिमित्त काढलेला गौरव अंक, २००४, संपादक दिनकर पाटील, पृष्ठ ११ |
| ८. जाधव, सुहास | | अक्षरयात्री, ज्येष्ठ साहित्यिक श्याम कुरळे यांच्या एकसष्टीनिमित्त काढलेला गौरव अंक, २००४, संपादक दिनकर पाटील, पृष्ठ २४ |
| ९. जोशी, अनंत लक्ष्मण (संपा.) | : | मराठी सारस्वत (प्रथम खंड), अनमोल प्रकाशन, ६८३, बुधवार पेठ, पुणे, आवृत्ती १९८६, पृष्ठ १०८ |